लोकमत

# मुंबईच्या पोटातले मेट्रोचे भुयार आले मेरिटमध्ये

## स्थापत्य कामे ८२ टक्के, स्थानकांची कामे ७९ टक्के आणि प्रकल्पाची कामे झाली ७१ टक्के पूर्ण

**सचिन लुंगसे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : मुंबईच्या पोटात वेगाने भुयार खणणाऱ्या कुलाबा - वांद्रे - सीप्झ या पहिल्या वहिल्या मुंबई मेट्रो - ३च्या भुयारी मार्ग प्रकल्पाचे एकंदरित काम ७१.५० टक्के पूर्ण झाली आहेत. शिवाय स्थापत्य कामे ८२ टक्के पूर्ण झाली असून, प्रणालीविषयक कामे ३४ टक्के पूर्ण झाली आहेत, तर स्थानकांची कामे ७९ टक्के झाली असून, प्रकल्पाचे एकूण ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

आरे येथील कारशेडच्या वादानंतर भुयारी मेट्रोच्या कारशेडचा मुद्दा आजही निकाली निघाला नसला तरीदेखील मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने आपल्या उर्वरित कामांचा धडाका लावला आहे. प्रकल्पाचे एकूण ९७ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. भुयारीकरणाचे उर्वरित काम पॅकेज - ३ अंतर्गत महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल दरम्यान २ किलो मीटर अंतर सुरू आहे. आतापर्यंत मेट्रो - ३च्या स्थानकांच्या बांधणीचे जवळपास ७९ टक्के काम पूर्ण झाले आहे. स्टेशन बॉक्सच्या कॉंक्रीटिंगसह काही स्थानकांच्या पुनर्भरणाचे (बॅकफिलिंग) काम तसेच विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खोल्या बांधण्याचे काम विविध स्थानकांवर सुरू आहे.







### ८० टक्क्यांहून अधिक बांधकाम पूर्ण

**एम. आय. डी. सी**, सीप्झ, विधान भवन, मरोळ नाका, कफ परेड, सिद्धिविनायक, चर्चगेट, हुतात्मा चौक, मुंबई सेंट्रल आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ या स्थानकांचे ८० टक्क्यांहून अधिक बांधकाम पूर्ण झाले आहे.



### १०० टक्के बांधकाम पूर्ण

९ स्थानकांचे तिन्ही स्लॅबचे बेस स्लॅब, **कॉंकोर्स स्लॅब** आणि रुफ स्लॅब १०० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे. इतर स्थानकांचे काम प्रगतीपथावर आहे.

**भारतात प्रथमच :** मेट्रो - ३ रुळांमध्ये कंपने रोखणारी हाय अटेंशन लो व्हायब्रेशन या अद्ययावत प्रणालीचा वापर होत आहे. भारतात प्रथमत: या प्रणालीचा वापर होत असून, ध्वनी व कंपनांसंबंधी समस्यांसंदर्भात अमेरिकन स्टॅंडर्डप्रमाणे हे तंत्रज्ञान उपयोगात येणार आहे.

### २२ टक्के काम पूर्ण

मेट्रो - ३च्या रुळ बांधणीचे काम प्रगतीपथावर असून, २२ टक्के काम पूर्ण झाले आहे.